Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३३(२) ] शुक्रवार, ऑक्टोबर १०, २०२५/आश्विन १८, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४२३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा.—**(१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३१७ (ग्रामविकास विभाग) दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास यांचे पत्र क्र. जिपरि.-२०२५-प्र.क्र.१२-पं.रा.-२, दिनांक १७ सप्टेंबर, २०२५.

**आदेश**

क्रमांक कक्ष-१-जि.पं. व पं.स.-कावि-६४५-२०२५.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३१७ (ग्रामविकास विभाग) दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ अन्वये वाशिम जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण ०६ पंचायत समित्यांच्या सभापती पदाकरीता खालील प्रमाणे आरक्षण निश्चित करून दिले आहे, ते आरक्षण खालील प्रमाणे.—

| अनुसूचित जाती (महिला) | नागरिकांचा मागास प्रवर्ग | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) | सर्वसाधारण | सर्वसाधारण (महिला) |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०१ |

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्या सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २ फ यातील तरतुदीनुसार मी, योगेश कुंभेजकर, जिल्हाधिकारी, वाशिम याद्वारे जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्या गठीत होऊन लगतनंतरच्या दिवसापासून सुरू होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनु. जाती, अनु. जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी पंचायत सभापती पदे खालील प्रमाणे आरक्षित झाल्याचे अधिसूचित करून संबंधित पंचायत समितीस निश्चित करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नांव | सभापती पद ज्या प्रवर्गाकरीता आरक्षित झाले त्या प्रवर्गाचे नांव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मानोरा | अनुसूचित जाती महिला |
| २ | रिसोड | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ३ | मंगरुळपीर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ४ | वाशिम | सर्वसाधारण (महिला) |
| ५ | मालेगाव | सर्वसाधारण |
| ६ | कारंजा | सर्वसाधारण |

**योगेश कुंभेजकर** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
वाशिम.

वाशिम :
दिनांक १० ऑक्टोबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.